**परीक्षार्थींना सूचना :**

i) ही प्रश्नोत्तर पत्रिका आहे.

ii) ह्या प्रश्नोत्तर पत्रिकेत 'जोड्या जुळवा' प्रश्नासहित एकूण 63 प्रश्न आहेत.

iii) प्रश्नांची उत्तरे लिहिण्यासाठी पुस्तिकेमध्येच जागा दिली आहे. दिलेल्या जागेमध्येच उत्तरे लिहावीत.

iv) पेन्सिलीने लिहिलेले उत्तर ग्राह्य धरले जाणार नाही.

v) ह्या प्रश्नोत्तर पत्रिकेत दिलेल्या पर्याय, रिकाम्या जागा भरा आणि जोड्या लावा यासारख्या प्रश्नांच्या उत्तरांना खोडतोड करू नये. तसे केल्यास उत्तर ग्राह्य धरले जाणार नाही.

---

**I. पुढील 1 ते 15 पर्यंतच्या प्रश्नांना किंवा अपूर्ण वाक्यांशाना चार पर्याय दिले आहेत. त्यापैकी योग्य पर्यायी उत्तर निवडून लिहा.** **[15×1=15]**

1. घटनेच्यावेळी उपस्थित राहून तत्कालीन व्यक्तिनी लिहिलेला दस्तऐवज म्हणजेच ——
   (A) खबर (B) रणसंग्राम
   (C) भाऊसाहेबांची बखर (D) बखर

2. खालीलपैकी एक प्रसिद्ध नाटककार कोण ?
   (A) श्रीनिवास कुलकर्णी (B) कृ.प्र. खाडिलकर
   (C) लोकहितवादी (D) भीमराव गस्ती

3. यापैकी कोणते पुस्तक मारूती चितमपल्ली यांचे नाही ?
   (A) दक्षिणरंग (B) रातवा
   (C) रानवाटा (D) जंगलाचं देणं

4. दारोदार फिरून मागून आणलेले अन्न म्हणजेच —
   (A) कोरडी भिक्षा (B) भिक्षा
   (C) माधुकरी (D) मिलो, मका, गहू इ.

5. शाळा या पाठाचे लेखक कोण ?
   (A) डॉ. भीमराव गस्ती (B) मारूती चितमपल्ली
   (C) श्रीनिवास कुलकर्णी (D) विद्याधर पुंडलिक

6. वामन पंडितांचे कोणकोणत्या भाषेवर वर्चस्व होते ?
   (A) संस्कृत व हिंदी (B) संस्कृत व फारसी
   (C) संस्कृत व कन्नड (D) संस्कृत व मराठी

7. जिथे प्राण्यांना अभय मिळते ते —
   (A) प्राणिसंग्रहालय (B) अभयारण्य
   (C) रान (D) उपवन

8. माणसावर कशाचे शिक्के बसले आहेत ?
   (A) जातीपातीचे (B) धर्माचे
   (C) सत्तेचे (D) स्पर्धेचे

9. 'स्वातंत्र्योत्तर मराठी कविता' हे पुस्तक कुणी संपादित केले आहे ?
   (A) लिना सोहनी (B) सौ. राधा जोगळेकर
   (C) तु. शं. कुलकर्णी (D) डॉ. यु. म. पठाण

10. मनोरथ या संधीयुक्त शब्दाच्या नियमात बसणारा एक शब्द —
    (A) सच्चरित्र (B) चंद्रोदय
    (C) गुरुपदेश (D) अधोवदन

11. 'कार्यक्रम पाहण्यासाठी जमलेले लोक' — शब्दसमुहास एक शब्द द्या.
    (A) दर्शक (B) श्रोते
    (C) समीक्षक (D) प्रेक्षक

12. 'नंतर' या क्रियाविशेषणाचा प्रकार कोणता ?

(A) स्थलवाचक (B) परिणामवाचक

(C) कालवाचक (D) रीतिवाचक

13. 'भार्या' या शब्दाचा समानार्थी शब्द ओळखा.

(A) भगिनी (B) सखी

(C) पत्नी (D) कांता

14. 'उन्नती' या शब्दाचा विरूद्धार्थी शब्द —

(A) अउन्नती (B) अवनती

(C) प्रगती (D) बढती

15. मनोज आताच <u>कॉलेजा</u> आला. अधोरेखित शब्दाला कोणत्या विभक्तीचा प्रत्यय लागतो ?

(A) पंचमी (B) षष्ठी

(C) तृतीया (D) चतुर्थी

**II. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.** **[5×1=5]**

16. आशाराणींचे घर ______________________ भागात होते.

17. लिंबाशेजारीच एक मोठा ______________________ होता.

18. सोप्या भाषेत लेखन करणाऱ्या कवयित्री म्हणून ______________________ यांना ओळखतात.

19. मंदारमाला वृत्तात अक्षरसंख्या ______________________ असते.

20. संस्कृतमधून थोडाफार बदल होऊन मराठीत येणाऱ्या शब्दांना ______________________ म्हणतात.

**III. 21. जोड्या जुळवा.** **[5×1=5]**

| अ | ब | क (उत्तरांसाठी) |
|---|---|---|
| (i) आजी शरण येते | ज्ञानलालसा | (i) ________________ |
| (ii) मातबर खासे ... | देवचाफा | (ii) ________________ |
| (iii) ग्रीष्मातल्या सकाळी | भाऊसाहेबांची बखर | (iii) ________________ |
| (iv) कोरडी भिक्षा | पोपटी चौकट | (iv) ________________ |
| (v) धन्य मी शबरी ... | पीकपाणी | (v) ________________ |
| | श्रावणमेघ | |
| | गीतरामायण | |
| | जोगिया | |

**IV. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** **[10×1=10]**

22. गो.ब. देवलाना शारदा हे नाटक कसे सुचले ?

23. वल्लरी इंदिरा काकूना काय सांगते ?

24. हिरा या पाठाचा साहित्यप्रकार कोणता ?

25. शांता शेळके यांच्या तीन काव्यसंग्रहांची नावे लिहा.

26. उदरनिर्वाहासाठी लेखकाची आई कोणता व्यवसाय करत असे ?

27. कोणत्या प्रयोगात कर्त्याची प्रथमा व कर्माची प्रथमा किंवा द्वितीया विभक्ती असते ?

28. 'मी सध्या एक कादंबरी लिहित आहे.' या वाक्यातील काळ ओळखा.

29. 'डोळ्यात केर व कानात फुंकर' या म्हणीचा अर्थ लिहा.

30. गारपीठ झाली. आंब्याचे नुकसान झाले. या केवल वाक्यांचे संयुक्त वाक्य करा.

31. आपल्याला विकायला काढले असे शारदेला का वाटते ?

**V. खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा. [15×2=30]**

32. आजोबानी तरूणवयात शौर्य गाजवले होते हे कोणत्या गोष्टीवरून समजते ?

33. माणसापेक्षा पक्षी सुखी आहेत असे लेखकाला का वाटते ?

34. डॉ. भीमराव गस्ती यांचा परिचय द्या.

35. सायंकाळी बाईसा पूजेची कशी तयारी करत असत ?

36. टाकळीला 'सैनिक टाकळी' हे नाव तुम्हास यथार्थ वाटते का ?

37. दारूमुळे कोणते दुष्परिणाम होतात ?

38. कवी केशवकुमार यांचा परिचय लिहा.

39. सत्पुरूषाचे सहा गुण कोणते ?

40. अकस्मात सुगंध दरवळल्यावर काय घडले ?

41. माय कवितेच्या आधारे कवीचे बालपण वर्णन करा.

42. बंगला कोसळण्याची खरी कारणे कोणती होती ?

43. अपन्हुति अलंकाराची व्याख्या सांगून एक उदाहरण लिहा.

44. लघुगुरुलेखन करून वृत्त ओळखा.
देवा ! तू तरि टाकिं अश्रु वरूनि, त्या साठिं तो तापला.

45. खालील सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.
(अ) गुरुसेवा
(ब) सोनेनाणे

46. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.
(अ) कावराबावरा होणे
(ब) पाळत ठेवणे

**VI. खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.** **[10×3=30]**

47. किरण बेदी यांचा परिचय लिहा.

48. डॉक्टरांच्या जीवनातील अविस्मरणीय घटना कोणती ?

49. अपघात कथेद्वारा लेखिकेने कोणता संदेश दिला आहे ?

50. 'हे पाणी पिण्याचं आहे. तोंड धुवून थुंकण्याच नाही.' ससंदर्भ स्पष्ट करा.

51. कृष्णाला उखळास बांधल्यावर घडलेल्या प्रसंगाचे वर्णन करा.

52. समर्थ रामदासांच्या मते राजा कसा असावा ?

53. पर्वणी या कवितेद्वारे दासगणू मानवजातीला कोणता संदेश देतात ?

54. कोळी लोकांच्या दिनचर्येचे वर्णन करा.

55. 'मीच विनविते हात जोडूनी वाट वाकडी करू नका.' ससंदर्भ स्पष्ट करा.

56. शबरीने श्रीरामाच्या पूजेची तयारी कशी केली होती ?

**VII. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी आठ ते दहा वाक्यात लिहा.** **[4×4=16]**

57. चीनच्या भिंतीचे सविस्तर वर्णन करा.

58. मराठी भाषेत कोणकोणत्या भाषेतील शब्द आले आहेत हे पाठाच्या आधारे लिहा.

59. तू तर चाफेकळी या कवितेचा सारांश थोडक्यात लिहा.

60. कवितेच्या ओळी पूर्ण करा.

असा वेडाखुळा ..............................

...............................................

...............................................

...................................मंजिरीशी.

**VIII. खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा.** **[4×1=4]**

61. मित्र कोणाला म्हणायचे ? जो आपल्याला संकटकाळी मदत करतो तोच खरा मित्र. माणसाजवळ पैसा, मानमरातब असेल, प्रतिष्ठा असेल, तेव्हा सर्वजण त्याच्या अवतीभवती जमा होतात; त्याचा उदोउदो करतात; पण जेव्हा तो निर्धन होतो, तेव्हा त्यावेळी कुणी त्याच्याकडे ढुंकूनही पाहत नाही. जणूकाही आपला व त्याचा काहीच संबंध नाही; तो आपला कुणी नाही ! मराठीत एक म्हण आहेच की,'असतील शीते तर जमतील भुते.' पण कठीण काळ आल्यावर कोण उपयोगी पडतो ? कुणीच उपयोगी पडत नाही. अशावेळी जो कामास येतो, तोच खरा आपला हितचिंतक होय. म्हणून कवीला प्रश्न पडला आहे की, 'कठीण समय येता कोण कामास येतो ?'

**प्रश्न :**

i) खरा मित्र कोणास म्हणावे ?

ii) माणसाच्या अवतीभवती सर्वजण केव्हा गोळा होतात ?

iii) कवीला कोणता प्रश्न पडला आहे ?

iv) उताऱ्याला योग्य शीर्षक द्या.

**IX. पत्रलेखन करा.** **[1×5=5]**

62. सैन्यात भरती झालेल्या तुमच्या भावाचा गौरव करणारे पत्र लिहा.

**अथवा**

अतिवृष्टीमुळे तुमच्या विभागात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्या समस्या लवकर दूर करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज करा.

**X. निबंधलेखन करा.** **[1×5=5]**

63. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर 15 ते 20 ओळी निबंधलेखन करा.

i) मी भारतमाता बोलते.

ii) युवा पिढी आणि व्यसनाधिनता.

iii) संगणक : शाप की वरदान.